नि.क्र.**१७/(क)** (१) नियमीत फौजदारी खटला क्रमांक **६४/२०१६**
शासन विरूद्ध संदेश विजय जाधव + १

**<u>रोहा येथील प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड यांच्या न्यायालयात</u>**

**<u>दो षा रो प</u>**

(फौ. प्र. सं., १९७३ चे कलम २११, २१२, २१३)

नि. फौ. ख. क्र.**६४/२०१६** निशाणी क्रमांक **१७/क**

मी, **सुभाष ल. फुले**, प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा, जिल्हा रायगड तुमच्यावर,

०१. **संदेश विजय जाधव.**
वय : २५ वर्षे, व्यवसाय : वाहन चालक.
राहणार : दत्तनगर, गजानन महाराज मंदिर,
माणगांव, जिल्हा : रायगड.

०२. **अशोक लक्ष्मण पवार.**
वय : २७ वर्षे, व्यवसाय : मोलमजुरी.
राहणार : धगडवाडी, आदिवासीवाडी,
तालुका : रोहा, जिल्हा : रायगड.

**<u>दोषारोप ठेवतो ते खालीलप्रमाणे</u>** :-

पहिले असे की, तुम्ही समान उद्देशाच्या पुरसरणार्थ दिनांक **३०.०१.२०१४**, वार गुरुवार रोजीचे **१६.३०** वाजताच्या सुमारास या

न्यायालयाचे स्थळसीमेत, पोलीस ठाणे, रोहाच्या कार्यक्षेत्रात मौजे बल्हे गावाच्या हद्दीत, कुंडलिका नदीच्या किनारी एक लोखंडी पत्रा असलेली होडी, दोन लाकडी होड्या, ट्रक नोंदणी क्रमांक एम्. एच्. ०६ ए. जी. ९४१२, ०९ घमेली, ०६ फावडे, ०४ बांबू यांचा वापर करुन शासनाच्या संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने स्वत:च्या फायद्याकरीता कुंडलिका नदीच्या पात्रातून ०५ ब्रास रेती चोरी केली व त्याद्वारे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ सह वाचनीय कलम ३४ अन्वये दंडनीय अपराध केला.

दुसरे असे की, तुम्ही समान उद्देशाच्या पुरसरणार्थ वरील तारीख, वेळी व ठिकाणी होडी, ट्रक, घमेली, फावडे व बांबूचा वापर करुन कुंडलिका नदीच्या पात्रातून शासनाची कोणतीही परवानगी न घेता रेती काढून पर्यावरणाचा -हास केला व त्याद्वारे पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चे कलम १५ सह वाचनीय भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४ अन्वये दंडनीय अपराध केला.

आणि मी याद्वारे तुमच्याविरूद्ध वरील गुन्ह्याकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

(आरोपीला दोषारोप वाचून व समजावून सांगीतला त्याने गुन्हा केल्याचे नाकारले व संपरीक्षा घेण्याची मागणी केली.)

मोहोर ---**स्वाक्षरी**---

**(सुभाष ल. फुले)**
**(एम्.एच्.आर.जी. ०००९ - २१२५)**
**ठिकाण : रोहा.** **प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा.**
**दिनांक : ०८.१२.२०१७.** **जिल्हा रायगड.**